Vol II Issue X April 2013

Impact Factor : 1.2018

ISSN No :2231-5063

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1.2018**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 10, April. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# गौरी देशपांडे यांच्या 'गोफ'या कादंबरीचे स्त्रीवादी आकलन व नात्यातील भावबंध

वैशाली जितेंद्र साठे

सहशिक्षिका न्यु हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज वडाळा

***सारांश:***

मराठी साहित्यातील अनेक प्रवहापैकी स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा एक प्रवाह आहे . हा प्रवाह साधारणतः **1960** नंतर साहित्यात येताना दिसतो . स्त्रीवाद ही संकल्पना पाश्चात्य देशातून,अमेरिकेतून आपल्याकडे आलेली आहे . स्त्री आणि पुरूष या निसर्गाने निर्माण केलल्या दोन जाती,पण यातील पुरूष श्रेष्ठ आणि स्त्री अतिशय कनिष्ठ अशी भूमिका शेकडो वर्षापासुन समाजात रूजली होती . आणि या विचारातुन होणारा अन्याय़अत्याचार स्त्री मुकपणे सहन करत होती . या अन्यायाविरूध्द बंड करणे़आवाज उठवणे या गोष्टी तिच्या गावी नव्हत्या . मुळात ती स्वतःच्या अस्तित्वाबद्दलच अनभिज्ञ होती . आपण समाजातील एक दुय्यम घटक आहोत हीच तिची धारणा होती . काही समाजसुधारकांनी स्वातंत्रपूर्व काळापासुनच स्त्रियांच्या प्रगतीसाठी प्रयत्न सुरू केले होते . स्वातंत्र्यानंतर तर स्त्रीला कायद्यानेच समान हक्क देण्यात आले . परंतु या हक्काची जाणिव होण्यासठी स्त्रीला खूप वेळ द्यावा लागला . कारण भारतीय संस्कृती,रूढीपरंपरा़धार्मिक नियम यांना डावलणे स्त्रीमनाला सहज शक्य नव्हते . अनेक समाजिक व राजकिय चळवळी,स्त्री शिक्षणाचा पुरस्कार व शासकिय सुविधा यामुळे स्त्रीची दृष्टी सगज बनली व स्त्रियांच्या प्रगतीला चालना मिळाली . तिला स्वची जाणिव होऊलागली . व्यावसायिक व आर्थिक दृष्टया सक्षम होता येते किंवा आपणही आपली स्वतंत्र मते प्रस्थापित करू शकतो हा आत्मविश्वास स्त्रियांमध्ये निर्माण झाला . याचे प्रतिबिंब साहित्यात उमटु लागले .

## *प्रस्तावना :–*

अनेक लेखिका बदलत्या स्त्रीजीवनाचे चित्रण साहित्यातून करू लागल्या . स्त्रीचे मन ,विचार,भावना,अनुभव अनेक कथाकादंबयातून व्यक्त होऊ लागले . काही लेखिकांनी आपल्या साहित्यातून स्त्रीविशिष्ट अनुभव,लैंगिक,शारिरीक अनुभव ही मांडले तर काहिंनी स्त्रीच्या मनोव्यथेचा,भावनांचा प्रकर्षाने विचार केला . साहित्यातून स्त्रीचा माणूस म्हणून विचार केला जाऊ लागला . यातुनच साहित्यात स्त्रीवादी साहित्य हा प्रवाह मानला जाऊलागला . स्त्री ही स्त्री म्हणुन आपले वेगळेपण मान्य करून जेंव्हा स्वतःच्या म्हणुन जाणिवा व्यक्त करते ते स्त्रीवादी साहित्य होय .

गौरी देशपांडे यांच्या लेखनातुनही अशाच प्रकारचा अनुभव येतो . म्हणुनच मराठी साहित्यक्षेत्रात त्यांचा प्रसिध्द स्त्रीवादी लेखिका म्हणुन उल्लेख केला जातो . मराठी साहित्यामध्ये खळबळ माजवणाया एक आधुनिक व बंडखोर लेखिका म्हणुन त्यांना ओळखले जाते . स्पष्ट आणि वास्तव लेखनामुळे त्यांचे साहित्य पटकन वाचकाच्या मनाला भिडते . गौरी देशपांडे यांनी आजची आधुनिक बदलत्या काळातील स्त्री,तिचे परपुरूषांशी असलेले संबंध,पाश्चात संस्कृती,लग्नसंस्था,लिव्ह इन टुगेदर ची संकल्पना,स्त्रीजीवनातील लैंगिक स्वातंत्र्य इ . विषय कथाकादंबयातुन चित्रित केले आहेत . म्हणुनच त्यांच्या कथाकादंबया वाचुन वाचक बिचकल्याशिवाय किंवा चकित झाल्याशिवाय राहत नाही . त्यांच्या स्त्रीवादी लेखनातुन स्त्रीच्या समाजातील बदलत्या स्वरूपाचा,भुमिकेचा व विचारसारणिचा परिचय होतो .

मराठी साहित्यामध्ये त्यांच्या कादंबयांना स्वतंत्र व महत्त्वपुर्ण स्थान आहे . त्यांची 'गोफ' ही कादंबरी मौज प्रकाशनने **1999** मध्ये प्रसिध्द केली . या कादंबरीतुन आधुनिक विचारसारणीची वेगवेगळी रूपे,माणसामाणसांच्या नातेबंधातुन विशेषतः स्त्री पुरूषांच्या नातेसंबंधातुन चित्रित झाली आहेत . या कादंबरीतुन मुख्यता सासु आणि सुन या नातेसंबंधातील संमिश्र भावभावनांचा गोफ हळुवारपणे गुंफला गेलेला आहे . दोन स्त्रियांमधील या नात्यतील अंतविरोध आणि त्यातुनच साधत गेलेले संवादाचे,मायेचे भावबंध हे या कादंबरीचे वैशिष्टय आहे . जिवंत चैतन्यमय भाषा, व्यक्तीरेखांच्या मनोवृत्तीचे सुक्ष्म बारकावे वाचकाला शेवटपर्यंत गुंतवुन ठेवतात . वेगळा आकृतीबंध हेही या कादंबरीचे वैशिष्टय आहे . ही कादंबरी मां व वसुमती या दोन व्यक्तिरेखांच्या निवेदनातुन साकारते .
या कादंबरीतुन स्त्रीवादी विचारसारणीचा परिचय होतो . या कादंबरीतील स्त्री स्वतंत्र विचाराची,समर्थपणे स्वतःच्या पायावर उभी असणारी,इतरांच्या जाणिवंच्या विचार करणारी आहे . या कादंबरीतील सासु जुन्या पिढीतील असतानाही विधवा सुनेचे परपुरूषाशी असणारे संबंध स्वीकारते,त्यांच्या लग्नाचा स्वतःहुन विचार करते .

या कादंबरीतील मां ही व्यक्तिरेखा विधवा आहे . जुन्या पिढीतील असतानाही त्या आधुनिक विचार सारणीचा पुरस्कार करतात . मां कुठेही डळमळीत किंवा हताश झालेल्या दिसत नाही . त्या पतीच्या मृत्युनंतर जीवाच्या आकांताने आपलं अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करतात . पतीच्या निधनानंतर जन्माला आलेल्या सुलक्षणाला मोठ करतात . त्या स्वतःच्या हक्कासाठी सासरच्या माणसांशी संघर्ष करतात व स्वतःचे हक्क मिळवतात . स्वतंत्रपणे शेती,गुरे,कामगार माणसे सांभाळतात . समर्थपणे स्वतःचा संसार उभा करतात . सुलक्षण वीस वर्षाचा असतानाच घर सोडुन मुंबईला निघुन जातो . तरीही मां डगमगत नाहीत . हताश होत नाहीत . त्याला भेटण्याचा प्रयत्न करत नाहीत . याचना,विनंत्या कराण्याचा प्रयत्न करत नहीत . घर,शेती,जनावरे,माणसं हा परिवार पुर्वीप्रमाणेच सांभाळतात . आनंद नावाच्या बहिणीच्या मलाची जबाबदारीही स्वीकारतात . त्याचं शिक्षण,संगोपन सगळं पार पाडतात .

सुलक्षणचा व्यसनामुळे मृत्यु होतो पण मां एकुलत्या एका मुलाच्या मृत्युने खचुन जात नाहीत कारण त्याने तो मृत्यु स्वतःच्या हाताने ओढवुन घेतलेला होता . त्या आपल्या सुनेचा वसुमतीचा व नातु आदित्यचा विचार करतात . वसुमतीवर कुठलेही जबरदस्ती न करता खुप प्रयत्नाने तिच्या मर्जीने तिला घरी घेऊन येतात . सुलक्षणचा मित्र जसपाल याला मुलगा मानतात . वसुमती व जसपालचे लग्न जुळावेही त्यांची मनोमन इच्छा होती . तरीही त्या लगेच लग्नाचा आग्रह न करता त्या दोघांमध्ये असलेले संबंध स्वीकारतात व योग्य वेळ येताच वसुमती व जसपालच्या लग्नाची तयारी करतात . इथे त्या वसुमतीवर कोणताही स्वतःचा निर्णय लादत नाहीत हे

**Title :** गौरी देशपांडे यांच्या 'गोफ'या कादंबरीचे स्त्रीवादी आकलन व नात्यातील भावबंध
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** वैशाली जितेंद्र साठे **yr:2013 vol:2 iss:10**

महत्वाचे आहे . मां च्या विचारातुन व वर्तनातुन एका आधुनिक विचारसारणीचा परिचय होतो . त्या दिवाळीचे कपडे खरेदी करताना त्यांच्या बदललेल्या विचारसारणीचा परिचय होतो . त्या स्वतः वसुमती व अंजना वापरत असलेल्या कपडयांच्या रंगाबद्दल सजगपणे विचार करतात . आम्ही विधवा म्हणुन, ती टाकलेली म्हणुन आम्ही फक्त पांढ-या,करडया असल्या कसल्या तरीही कपडयात वावरायच की काय? हा त्यांचा विचार स्वतःचा स्त्री म्हणुन नाही तर माणुस म्हणुन विचार करणारा आहे . मां आवर्जुन स्वतःसाठी,वसुमतीसठी,अंजनासाठी चांगल्या रंगाची कपडे निवडतात . हे त्यांचे वर्तन प्रगतशील आहे .

मां प्रमाणेच वसुमतीच्या व्यक्तीमत्वातुन स्त्रीवादी विचारसारणीचाच परिचय होतो . वसुमती सुलक्षणाचा मृत्युनंतर सुरूवातीला सासरी राहणं नाकारते कारण तिच्या मते ती जर सासरी गेली तर तिला तिचा व अदित्याचा स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही . शिवाय कुणाच्याही मदतीशिवाय जगण्याची उमेद वसुमतीमध्ये होती . वसुमती आईकडे राहण्याचा निर्णय घेते . तथे ती घरातल्या संपुर्ण जबाबदायाबरोबर नौकरी करते व मुलाच्या शिक्षणाचा स्वतःचाखर्च भागवते . खरं तर सुलक्षणने काही पैसे तिच्यासाठी ठेवले होते पण ती त्या आधारावार न राहता स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करते .

वसुमती काही कालावधीनंतर मां व भन्तेच्या प्रयत्नाने गावी (सासरी)जाते . तिथे ही ती अगदी खंबीरपणे संपुर्ण शेतीची,घराची जबाबदारी पार पाडताना दिसते . शेतावरच्या कामासहित धारा काढणे,ट्रॅक्टर चालवणे,मोटारी दुरूस्ती करणे इत्यादी परूषांच्या बरोबरीची कामे करते . अंजना ह्या शेतात काम करणाया बाईवर अन्याय होतो हे पाहुन पेटुन उठते . अंजनाल मुल होत नाही म्हणुन दुसर लग्न करायला निघालेल्या तिच्या नवयाला सुनावते . माहेरी गेलेल्या अंजनाला वसुमती परत आणते वस्वतःच्या घरी ठेवुन घेते . अंजनासाठी पटुन उठण,तिची मदत करण ह्या वसुमतीच्या भावनेमागे स्त्रीवर होणाया अन्यायाचा प्रतिकार करणे हा उद्देश आहे .
वसुमती पुरूषांप्रमाणे जीन्स व शर्ट असे कपडे वापरते . जसपाल बरोबर मैत्रीबरोबर शरीरसंबंधही ठेवते व त्याच्याशी पुनर्विवाह करते .
एकंदरीत मं व वसुमती या दोन्ही व्यक्तीरेखांच्या वर्तनातुन,विचारातुन अधुनिक स्त्रीचा परिचय होतो . त्याचबरोबर नात्यांचेही भावबंध सुक्ष्मपणे आले आहेत .
मां व वसुमती या सासासुनांच्या नात्याबरोबरच त्यांच्या परिघातील त्या दोघींशी जोडलेल्या सुलक्षण,आनंद,जसपाल,अदित्य या नात्यांचेही भावबंध चित्रित झालेले आहेत . दोन स्त्रियांमधील या नात्यातील अंतर्विरोध आणि त्यातुनच साधत गेलेले संवादाचे मायेचे अतुट भावबंध हे या कादंबरीचे केंद्र आहे .
मां,वसुमती,आदित्य,सुलक्षण,जसपाल,आनंद,धर्मकीर्ती,आदित्य या व्यक्तिरेखा एकमेकांशी कुठल्या धाग्याने घट्ट अतुटपणे बांधलेल्या आहेत .

मांचा सुलक्षणवर खुप जीव होता पण तो त्यांच्यापासुन दुरावतो . त्याच सिनेमात काम करणं व्यसनी असण या गोष्टी मांना आवडत नव्हत्या . सुलक्षणही आपल्या आईला आयुष्यभर जवळ येण्याला प्रखरपणे प्रतिबंध घालतो . तरीही सुलक्षणच्या मृत्युच्या शेवटच्या क्षणी मां विरघळुन जातात . त्यांच्या मनामध्ये सुलक्षणविषयी कुठेही तक्रार राहत नाही . त्या त्याला बिछाण्यावर खिळलेला पाहुन भावुक होतात . त्याच्याकडे एकटक पाहुन त्याला डोळयात सामावुन घेण्याचा प्रयत्न करतात . आता रडायला हरकत नव्हती पण भरून आले तर त्याचा चेहरा नीट दिसणार नाही अशा विचाराने की काय,डोळयांनी अश्रु गाळायचे नाकारलं (1)मां ची वीस वर्षाचा असताना घर सोडुन गेलेल्या आपल्या मुलाविषयीची अगतिकता जीवघेणी आहे . सुलक्षणाच्या मृत्युनंतर आपल्या विधवा सुनेबद्दल सुरूवातीला मां च्या मनात आकस दिसुन येतो,पण तिची होणारी कुतरओढ पाहुन त्यांना तिची कठाव येते . शिवाय आदित्य हा त्यांचा नातु हा त्यांच्या वंशाचा दिवा हा वसुमती व मां ना जोडणारा दुवा आहे . मां ना वसुमतीने आपल्याकडे राहायला यावे घर,संसार संभाळाव असे मनोमन वाटले तरीही त्या तिच्यावर जबरदस्ती करत नाहीत . त्या तिला निर्णय घेण्यासाठी वेळ देतात . मां नी भाऊम्हणुन मानलेल्या धर्मकीर्तीच्या मदतीने त्या वसुमतीला घरी घेऊन येतात व संपुर्ण घराची,शेताची मालकीण म्हणुन तिची ओळख करून देतात . वसुमती सतत काम करते हे पाहुन तिची काळजी करतात . जसपाललाही आपला मुलगा मानतात . जसपालने सुलक्षणच्या शेवटच्या क्षणी आपली व त्याची भेट घालुन दिली या भावनेने त्या भारावुन जातात . त्यानं येऊन मला अखेर सूलक्षणकडे नेलं आणि त्या रात्री आंम्हाा सर्वांपासुन दाबुन ठेवलेलं रड आदित्य त्याच्या गळयात पडुन रडला . त्याच्या बरोबर जसपालही बघुन एकदम माझा सुलक्षण थोडासा परत मिळाल्यासारखं झालं . आता त्याच वसुमतीचं पुढ माग काय जमत बघायच पण नाही काही जमलं तरीही मला एक पोर मिळाला हे काय कमी आहे? (2)या त्यांच्या चिंतनातुन त्यांची वसुमतीचे,आदित्यची काळजी व जसपालवरच निरपेक्ष प्रेम दिसुन येते . मां आनंदावरही पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करतात . आनंद हा त्यांच्या बहिणीचा मुलगा आहे . मां वसुमती व आदित्यबरोबरच जसपाल व आनंदावर तितकेच माया करतात .

वसुमतीही अशाच प्रकारे आपल्या सभोवतालच्या नात्यावर जिवापाढ प्रेम करताना दिसते . तिचा सुलक्षणवर खुप जीव होता . लग्नानंतर तिच्या लक्षात येते की तो व्यसनाच्या पुर्णपणे आहारी गेला आहे . तेंव्हा मग वसुमती रागाने त्याच्यापासुन थोडीसी विचलीत होते . तो आजारातुन वाचणार नाही या जाणिवेने दुःखी होते . तिचे प्रेम हे त्याच्या कट्टधाराची शक्ती किंवा प्रेरणा होऊशकणार नाही म्हणुन तिचे मन कडूजार होते . ती प्रेमापोटी नाही पण गरज किंवा कर्तव्यापोटी त्याच्यासाठी धडपड करते . तरीही सुलक्षणला आपण वाचवु शकलो नाही याचे दुःख तिला सतत टोचणी देत राहते . सुलक्षणसारख्या माणसाच्या असा हास व्हावा आणि तो मी बघत राहावा या हताशपणापायी अजुन संताप यायचा राहात नाही (3) सुलक्षणला वाचवण्यासाठी आपण असफल ठरलो याची खंत वसुमतीला वाटते . त्याचबरोबर सुलक्षणच्या छंदीफंदी स्वभावाबद्दल त्याला कोणी दुषने देणे तिला आवडत नाही . या कादंबरीमध्ये वसुमती व मां या दोघींच्या नात्यातील भावनिक गुंतागुंत खुप महत्वाची आहे . सुरूवातीला एकमेकींचा मनोमन तिरस्कार करणाया या दोघी हळुहळु एकमेकीची काळजी करू लागतात . एका प्रेमळ धाग्यांनी बांधल्या जातात . मां चा तर वसुमती आणि आदित्य हे आधारच होते . पण वसुमती केवळ भन्तेच्या आग्रहाखातर मां कडे येते व त्यांची काळजी केंव्हा करायला लागते हे तिलाही कळत नाही . त्या दोघी एकमेकींच्या भावनांचाही विचार करताना दिसतात . मांच्यात माझ्यात तर जवळजवळ कधी त्याचे नावही उच्चारले जात नाही . मला वाटते मला दुःख होईल म्हणुन त्या आणि त्यांना दुःख होईल म्हाणुन मी सगळे दाबुनच टाकतो . (4)या वसुमतीच्या विचारातुन मां व वसुमतीच्या नात्याची प्रचीती येते . जसपाल सहजच लग्न करून मुंबईला स्थायिक होऊ असं वसुमतीला म्हणतो,तेंव्हा वसुमतीच्या मनात मां चा विचार येतो . मां ना शेतातल्या बायामाणसांना सोडाव लागणार या भावनेनी वसुमती चिंतीत होते . या वेळी वसुमती आनंदचाही विचार करते .

एकंदरीत विचार करता मां व वसुमती या दोघांध्ये तर अतुट नात्याचे बंध निर्माण होतातच पण मां,अदित्य,वसुमती,जसपाल,आनंद,अंजना यांचा एक छानसा परिवारच तयार होतो .

याकादंबरीतील मां व वसुमती या प्रमुख व्यक्तिरेखा गौरी देशपांडेनी स्त्रीवादी विचारातुन साकारल्या आहेत याचाही प्रत्यय येतो .

संदर्भः

1) देशपांडे गौरी,'गोफ',मौज,प्रकाशन पृ . 7
2) देशपांडे गौरी,'गोफ',मौज,प्रकाशन पृ . 41
3) देशपांडे गौरी,'गोफ',मौज,प्रकाशन पृ . 48
4) देशपांडे गौरी,'गोफ',मौज,प्रकाशन पृ . 56

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net